# माशाची गोष्ट

लेखक: रॉबर्ट टॅलन





# माशाची गोष्ट

मराठी अनुवादः सुशील मेन्सन



“मला इथून बाहेर पडायचंय!”

छोट्टासा मासा म्हणाला.

“रोजरोज त्याच पाण्यात पोहण्याचा मला कंटाळा आलाय.

मला मोठ्ठा तलाव हवाय.”

जवळच भटकणाऱ्या मोठ्ठ्या बोक्याने हे शब्द ऐकले.

“मी तुला काही मदत करू का?”
मोठ्या बोक्याने विचारले.
“मला मोठ्ठं जग बघायचंय,”
छोट्टासा मासा म्हणाला.
“बाहेरचं जग खूप सुंदर आहे. खूपच सुंदर!” मोठ्ठा बोका म्हणाला.
“बाहेर फुलं....झाडं....समुद्र सारं काही आहे. पण त्या टेकडीवर.”





“समुद्र! म्हाताऱ्या माशाने मला समुद्राबद्दल

सांगितलंय,” छोट्टासा मासा म्हणाला.
“मला तिथे घेऊन जाशील?”
“का नाही?” मोठ्ठा बोका म्हणाला.
“पण मी आधी घरी जातो आणि तुला घेऊन जाण्यासाठी एक पिशवी आणतो.”
“लवकर जा आणि लवकर ये,” छोट्टासा मासा उतावीळ होत म्हणाला.

मोठ्ठा बोका प्लास्टिकची मोठ्ठी पिशवी घेऊन परतला.
त्याने पिशवी पाण्यात बुडवली.
छोट्टासा मासा पिशवीत शिरला.
“धन्यवाद,” छोट्टासा मासा म्हणाला.
“कधीतरी मी तुझ्या या उपकाराची जरूर परतफेड करेन.”
“त्याची गरज नाही. मित्राला मदत करायला मला आनंदच वाटतो,” मोठ्ठा बोका जिभल्या चाटत म्हणाला.



मोठ्ठा बोका जंगलातून धावू लागला.

“किती सुंदर!....ते फूल आहे का?”

छोट्ट्याशा माशाने विचारले.

“होय, ते फूल आहे,” मोठ्ठा बोका उत्तरला.

“तो पक्षी आहे का?”

“होय,” मोठ्ठा बोका गुरगुरला.

“आपण थांबूया का?”

छोट्ट्याशा माशाने विचारले.

“नाही,” मोठ्ठा बोका किंचाळत म्हणाला.

“समुद्र कुठाय?” छोट्ट्याशा माशाने विचारले.

“टेकडीवर,” मोठ्ठा बोका म्हणाला.

“आता शांत राहा. तू खूप प्रश्न विचारतोस.”

“माफ कर,” छोट्टासा मासा म्हणाला.

“पण हे सारं मला नवीनच आहे.”



मोठ्ठा बोका धावत टेकडी चढू लागला. शेवटी तो एका जुनाट घरात शिरला आणि थांबला.

“या घरात आहे का समुद्र?” छोट्ट्याशा माशाने विचारले.

“तुझा प्रवास आता संपलाय,” मोठ्ठा बोका म्हणाला.

छोट्ट्याशा माशाने सभोवती भिंतीवर टांगलेल्या भांड्यांकडे आणि कढईकडे पाहिले.

“हाच....हाच....तुझा तलाव आहे का?” त्याने विचारले.

“नाही....हे माझं स्वयंपाकघर आहे मूर्खा,” मोठ्ठा बोका उत्तरला.

“आणि मी आता तुला छानपैकी शिजवून खाणार आहे.”



छोट्टासा मासा भयाने थरथरू लागला.
“पण का खाणार तू मला?” त्याने विचारले.
मोठ्ठा बोका आनंदाने गाणे
गुणगुणू लागला. त्याने आपल्या पंजाने कढईत
तेल टाकले.
“तुला म्हाताऱ्या माशांनी कधी
मांजर आणि मासा याबद्दल सांगितलं नाही का?”
त्याने विचारले.
“म्हणजे, तू मांजर आहेस?” छोट्ट्याशा माशाने
विचारले.
“होय, मी मोठ्ठा बोका आहे आणि थोड्याच
वेळात तुला मटकावणार आहे....पण माझी काही
दुश्मनी नाही बरं का तुझ्याशी.”



“पण माझ्या शरीरात फक्त हाडंच आहेत,” छोट्टासा मासा गयावया करत म्हणाला.

“चूप! मला हे स्वयंपाकाचं पुस्तक वाचू दे,” मोठ्ठा बोका ओरडला.

“हं....उकळायचं....भाजायचं....सोबत बदाम आणि क्रीम....तळलेला मासा लोणचे, मायोनीज, केळ्याचे चिप्स, केचप आणि
मोहरीसोबत! व्वा, भूक चाळवली
माझी!”

“अरे बोक्या, जरा थांबशील?” छोट्टासा मासा ओरडला.

“बघ जरा माझ्याकडे. माझ्यात फक्त हाडंच आहेत. फारतर नाश्ता होईल तुला. पण मला एक मोठ्ठा मासा माहितीय. तो इतका मोठ्ठा आहे की तुझं स्वयंपाकघर भरूनच जाईल.”





मोठ्या बोक्याने छोट्ट्याशा माशाकडे पाहिले.
“कुठे मिळेल हा मोठ्ठा मासा?” त्याने विचारले.
“तलावात. तुला महिनाभर पुरेल इतका मोठ्ठा आहे तो,” छोट्टासा मासा म्हणाला.
“तू मला परत तलावात घेऊन गेलास तर मी तुला तो मोठ्ठा मासा मिळवून देईन.”
“कसं काय?” मोठ्या बोक्याने विचारले.

“तुझ्याकडे केचप आहे?” छोट्ट्याशा माशाने विचारले.
“त्याचं काय करणार तू?” मोठ्ठ्या बोक्याने विचारले.
“मोठ्ठ्या माशाला केचप खूप आवडतं.”
“खरं की काय?” मोठ्ठ्या बोक्याने विचारले.
“तू फक्त मला तलावात घेऊन चल,” छोट्टासा मासा म्हणाला. “एक दोर घे, केचप घे आणि बाकीसारं माझ्यावर सोपव.”

मोठ्या बोक्याने छोट्ट्या माशाची पिशवी आणि सोबत केचपची पिशवीही घेतली. तो परत तलावाकडे धावू लागला.



त्याने छोट्ट्याशा माशाला परत तलावात सोडले.
मग त्याने दोराने केचपची पिशवी पाण्यात सोडली.
छोट्टासा मासा चटकन पिशवीतून तलावाच्या
पाण्यात शिरला आणि सभोवार फिरू लागला.
“किती छान वाटतंय माझ्या तलावात परतल्यावर!”
त्याच्या मनात आले.



मोठ्ठ्या बोक्याने दोराला हिसका दिला.
“छोट्या माशा, तुझ्या त्या मोठ्ठ्या माशाला लवकर बोलव. मला खूप
भूक लागलीय,” मोठ्ठा बोका म्हणाला.
छोट्ट्याशा माशाने दोर पकडला आणि तो पाण्यात खोलवर जाऊ लागला.
“बरं, मोठ्ठ्या बोक्या. आता खेच वरती,” छोट्टासा मासा म्हणाला.
मोठ्ठा बोका दोर खेचू लागला. त्याला खूप जोर लावावा लागत होता.



पण शेवटी त्याच्या हाती एक
गंज लागलेली सायकल आली.
“कुठाय मोठ्ठा मासा? तू मला फसवलंस!” मोठ्ठा बोका
किंचाळत इथे-तिथे उड्या मारू लागला.
छोट्टासा मासा पोहत-पोहत हसू लागला.
“मोठ्ठा मासा! ती तर एक खोट्टीखोट्टी गोष्ट होती,” तो
गाऊ लागला.
“मोठ्ठ्या माशाची गोष्ट....मोठ्ठ्या बोक्यासाठी!”

